**अध्याय** - 15

कार्य सुरळीत चालवण्यासाठी असलेली मार्गदर्शक तत्वे

**ध्येय :**

- रुग्णसेवेस माणुसकीचा स्पर्श

**दृष्टीक्षेप :**

- उपनगरीय रुग्णालयात देण्यात येणा-या माध्यमिक आरोग्य सेवांची दर्जोन्नती करुन तृतीय श्रेणीच्या आरोग्य सेवा देणे.
- सर्वसमावेशक व निरंतर आरोग्य सेवा पुरविणे.
- चोवीस तास प्रयोगशालेय निदान सुविधेसह रक्तपेढी, जीवरसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र व रेडिओलॉजी या सुविधाही उपलब्ध करुन देणे.
- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामध्ये सहभागी होणे.
- वैद्यकीय शिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्र म्हणून कार्य पाहणे.

**उद्दीष्टे :**

- उपनगरीय रुग्णालयात 24 x 7 x 365 दिवस निरंतर अविरत रुग्णसेवा.
- रुग्णांशी सौहार्दपूर्ण वागणुकीसाठी कर्मचा-यांना प्रोत्साहीत करणे.
- विभागाचे काम सुरळीत चालू राहण्यासाठी विविध विभागातील कर्मचा-यांमध्ये कुटुंब संकल्पना रुजविणे.
- सध्या उपलब्ध असलेल्या सेवांचे सक्षमीकरण.
- सध्या उपलब्ध असलेल्या सेवांचे दर्जोन्नतीकरण.
- सध्या उपलब्ध असलेल्या सेवांचे विस्तारीकरण.

**प्रस्तावित योजना:**

पुढील सेवांचे सक्षमीकरण व दर्जोन्नतीकरण

- अति दक्षता विभाग.

- विकृतिशास्त्र् विभाग - हिमॅटॉलॉजी, हिस्टोपॅथॉलॉजी.
- रक्तपेढी विभाग - प्रमुख रुग्णालयात रक्त घटक व विघटन कक्ष.
- क्ष-किरणशास्त्र विभाग - सी.टी.स्कॅन, एम.आर.आय.स्कॅन

नव्याने सुरु करण्यात येणा-या सेवा

- प्रमुख उपनगरीय रुग्णालयात विशेष स्टेम सेल प्रयोगशाळा.
- सर्व उपनगरीय रुग्णालयात पिडित महिला आधार केंद्र.
- त्वचा पेढी सुविधेसह स्टेट ऑफ आर्ट बर्न्स सेंटर - पूर्व उपनगर व पश्चिम उपनगर येथे प्रत्येकी एक.
- सध्याच्या नर्सिंग स्कूलची दर्जोन्नती करणे व पूर्व उपनगरासाठी नविन नर्सिंग स्कूल सुरु करणे.
- सी.पी.एस. व डी.एन.बी. पदव्युत्तर अभ्यासक्रम अंतर्गत निवासी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करणे.
- आय.सी.यू., सी.टी.स्कॅन, एम.आर.आय.स्कॅन, भूल- बधिरीकरण तज्ञ, रेडिऑलॉजी तज्ञ व किडनी डायलिसीस या सेवा सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत उपलब्ध करणे.
- रुग्णांसाठी स्वयंपाक, धोबी, सुरक्षा सेवा व परिरक्षण इ. सेवांचे बहि:स्त्रोतीकरण.

पुढीलप्रमाणे विशेष सेवा देण्याचे प्रस्तावित आहे.

- भांडूप येथे अतिविशेषोपचार रुग्णालय.
- पंजाबी गल्ली निदान केंद्र, बोरीवली.

बी.एस.ई.एस, रुग्णालय व सेव्हन हिल्स रुग्णालय यांच्याबरोबर झालेल्या करारान्वये मनपा रुग्णांना जास्तीत जास्त सेवा उपलब्ध करुन देणे.